सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपासः-
मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - पो.ना. बाळासाहेब ज्ञानदेव नागरगोजे,
वय - ३७ वर्षे,
नेमणुक - स्थानिक गुन्हे शाखा अहिल्यानगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. के. सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

दिनांक १७/०१/२०१९ रोजी मी नेवासा पोलीस स्टेशनला पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. सदर दिवशी पोलीस स्टेशनला हजर असताना पी.आयसाहेब रणजित ढेरे यांनी आम्हांला त्यांच्या केबिनमध्ये बोलवले व सांगितले की, ज्ञानेश्वर मंदिराकडून नेवासा गावाकडे एक वाळूचा टेम्पो येत आहे त्याची त्यांना गुप्त बातमी मिळाली आहे. त्यावेळी माझेसोबत पी.एस.आय. बहाकर, पो.हे.कॉ. गिते, पो.हे.कॉ. पवार व पो.कॉ. पोटे होते असे आम्ही सर्वजण बातमीच्या नमुद ठिकाणी गेलो. पो.हे.कॉ. गिते यांनी दोन पंचाना बोलावले. आम्ही बातमीच्या ठिकाणी थांबलो असता आम्हांला ज्ञानेश्वर मंदिराकडून एक पांढ-या रंगाचा टाटा कंपनीचा टेम्पो क्र. एम.एच. ०४ ई.एल. ७६०३ येताना दिसला. त्यास थांबण्याचा इशारा दिला असता तो रोडच्या कडेला थांबला. आम्ही टेम्पोकडे गेलो असता सदर टेम्पो चालक हा सागर पवार होता व त्याच्या बाजुला कडूबाळ थोरात होता. गाडी काय आहे अशी चौकशी केली असता वाळू असल्याच्या सदर इसमांनी सांगितले. आम्ही व पंचानी गाडीची पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे एक ब्रास वाळू मिळून आली. आम्ही वाहतूकीचा परवाना बाबत चौकशी केली असता परवाना नसल्याचे चालकाने सांगितले. पो.हे.कॉ. गिते यांनी जागीच पंचनामा केला व टेम्पो घेऊन पोलीस सटेशनला आलो. घटनेबाबत मी फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ३२ देण्यात येते. आरोपींना मी ओळखु शकतो.

सरतपास पूर्ण.

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. जे. बी. इनामदार यांचेमार्फत सुरु-

२. मी नेवासा येथे पाच वर्ष कार्यरत होतो. सध्या मी स्थानिक गुन्हे शाखा अहिल्यानगर येथे कार्यरत आहे. छापा टाकण्यासाठी जातेवेळी मी स्टेशन डायरीला नोंद केली नव्हती. आज स्टेशन डायरी सोबत आणलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्ञानेश्वर मंदिर हे जगातील प्रसिध्द देवस्थान आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्ञानेश्वर मंदिराजवळ कायम रहदारी असते. हे म्हणणे खरे आहे की, ज्ञानेश्वर मंदिराजवळ लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्ञानेश्वर मंदिराकडे जाताना लोकांना रस्ता कळावा म्हणून दोन कमानी आहेत. नेवासा

फाटयावर ज्ञानेश्वर मंदिराकडे जाण्यासाठी कमान आहे किंवा कसे हे मला माहित नाही. हे मला सांगता येणार नाही की, गणपती मंदिराजवळ ज्ञानेश्वर मंदिराकडे जाण्यासाठी कमान होती किंवा कसे. नेवासा पोलीस स्टेशनपासून घटनास्थळ हे अंदाजे १ कि.मी. आहे. मोटारसायकलने नेवासा पोलीस स्टेशनपासून घटनास्थळावर जाण्यासाठी पाच मिनिटाचा अवधी लागतो. ज्या खाजगी वाहनाने घटनास्थळावर गेलो त्या वाहनाचा नंबर मला सांगता येणार नाही. महसुल अधिका-यांना छापा टाकणेबाबत माहिती दिली नव्हती. वाळू मोजण्याचे साहित्य आमच्याजवळ नव्हते. वाळू महसुल अधिका-यांकडून तपासून घेतली नव्हती. वाळू खाली कोठे केली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला नेवासा शहराची ब-याचप्रमाणात ओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्हांला प्रत्येक महिन्याला वाळूच्या केसेस करण्यासाठी टार्गेट दिले जाते. हे म्हणणे खरे नाही की, मी वरीष्ठांच्या सांगण्यावरून खोटा गुन्हा दाखल केला व खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितला मजकूर खोटा सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा

दिनांक-०३/११/२०२५.